महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास वेतन बाबीकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ या चार महिन्यांकरिता निधी वितरीत करणेबाबत ...

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः-राअआ-२०१८/प्र.क्र.५६/का-९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. ०५ मे, २०१८.

वाचा :-

(१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८.

(२) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे पत्र क्र.राअआ/लेखा/प्र.क्र.१/ का-४/ २०१८-१९, दि. १८/३/२०१८ चे पत्र व सहपत्र

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ या चार महिन्यांचा खर्च भागविण्याकरिता मंजूर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये "२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६ सहायक अनुदाने (वेतन)" या लेखाशिर्षांतर्गत एकूण रु.७०,००,०००/- (अक्षरी रूपये सत्तर लक्ष फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. (१) येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये सन २०१८-१९ च्या प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर,२०१८अखेर) अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० टक्केच्या मर्यादेत सदर (बीम्स) प्रणालीद्वारे मंत्रालयीन विभागांना अनुदान वितरित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयासाठी प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर, २०१८अखेर) ७०% प्रमाणे रू.४९,००,०००/- (अक्षरी रूपये एकोण पन्नास लक्ष फक्त) पैकी मासिक रु. ५,४४,४४४/- (अक्षरी

रुपये पाच लक्ष चव्वेचाळीस हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) प्रमाणे (रु.५,४४,४४४/- X ४ = रु.२१,७७,७७६/-) **एकूण रु.२१,७७,७७६/- (अक्षरी रूपये एकवीस लक्ष सत्त्याहत्तर हजार सातशे शहात्तर फक्त)** च्या मर्यादेत राहून माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ या चार महिन्यांकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली इतके अनुदान खाली दर्शविलेल्या निधी विवरणाप्रमाणे सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

"२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य) **, ३६, सहायक अनुदाने (वेतन)"**				
अ. क्र.	**तपशीलवार लेखाशीर्ष**	**सन २०१८-१९ साठी अर्थ संकल्पीय अंदाज पुस्तिकेत दर्शविण्यात आलेले अनुदान (रु.)**	**पहिल्या नऊमाही साठी वितरित अनुदान (७०%) (माहे एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८) (रु.)**	**माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ करिता मंजूर अनुदान (प्रतिमाह) (रु.)**
१	**२**	**३**	**४**	**५**
१	३६,सहायक अनुदाने(वेतन)	७०,००,०००/-	४९,००,०००/-	(रु.५,४४,४४४/- X ४ = रु.२१,७७,७७६/-)
	एकूण	**७०,००,०००/-**	**४९,००,०००/-**	**२१,७७,७७६/-**
एकूण (अक्षरी रूपये एकवीस लक्ष सत्त्याहत्तर हजार सातशे शहात्तर फक्त)				

३. सदर तरतुद सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाने सन २०१८-१९ च्या मासिक निधी विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाचा खर्च विहित मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी.

या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या रकमेतून केलेल्या खर्चाचा तपशील, उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तसेच संदर्भ क्र. (१) मधील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये विहीत अटी व तरतुदींचे पालन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी करावे.

४. उपरोक्त रक्कम "मागणी क्र. झेडई -१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३६, सहायक अनुदाने (वेतन)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

५. "सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये

प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं- २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ मधील अटींची पुर्तता होत असून, प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. ”

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०५१५३५५०४११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2018.05.05 15:39:50 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
२. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. अवर सचिव, (व्यय-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. कक्ष अधिकारी, (का-७) , अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. निवडनस्ती (कार्यासन-९).